University circular about reservation

**Raja Shripatrao Bhagawantrao Mahavidyalay, Aundh**

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Special Cell –260 9148.
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र.विशेष कक्ष/325 दिनांक : 13 JUN 2019

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. सचिव,
सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : १. सन २०१९ – २०२० या शैक्षणिक वर्षामध्ये संलग्नित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षण

२. सन २०१९ – २०२० या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी वसतिगृह (हॉस्टेल) प्रवेशाबाबत..

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे आपणास योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे :

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJA | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NTB | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NTC | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NTD | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग | SEBC | १६ % |
| ९. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | EWS | १० % |
| १०. | खुला | Open | २४ % |
| | | एकूण | १०० % |

(टीप : संस्था/महाविद्यालयातील प्रवेशासाठीच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही शेवटच्या प्रवेश दिनांकापर्यंत करावयाची आहे.)

Office 02161/262324

**विद्यार्थी प्रवेशातील समांतर आरक्षणाबाबत :**

सामाजिक आरक्षणाबरोबरच खालीलप्रमाणे समांतर आरक्षण विद्यार्थी प्रवेशासाठी शासनाने निर्धारित केले आहे —

१. विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये महिलांसाठी पदवी स्तरावर शासन निर्णय क्र. जीईसी — २००० (१२३/२००७)/टी.ई.१ दि. १७.०४.२००० नुसार ३० टक्के आरक्षण देय आहे.

(सोबत पृष्ठ क्र. ६ ते ७)

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१८/प्र.क्र.२३१/तांशि—४ दि.२५.६.२०१८ नुसार अकृषी विद्यापीठे संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरीय प्रवेशामध्ये दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी साठी ५ टक्के आरक्षण देय आहे.

(सोबत पृष्ठ क्र. ८ ते ९)

३. शासन निर्णय क्र. २०११/प्र. क्र. २०१२/क्र. ३ दि. ०२.०४.२०१८ नुसार अनाथ विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १ टक्का आरक्षण देय आहे.

(सोबत पृष्ठ क्र. १० ते १२)

४. माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १० टक्के आरक्षण देय आहे. यासंदर्भातील कार्यवाहीसाठी कृपया खालील शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, अवलोकनी घेण्यात यावीत :

(सोबत पृष्ठ क्र. १३ ते १८)

अ) महाराष्ट्र शासनाचे क्र. औचिमु २०१२/प्र. क्र. १८७/विशि— ३ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. १६.०८.२०१२ रोजीचे शासन पत्र.

ब) महाराष्ट्र शासन, मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे क्र. युएनआय/२०१२/मा. सैनिक/अवि/विशि — ८ १८७११ दि. ०६.१२.२०१२ रोजीचे शासनपत्र.

क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. माजीसै—२००६/(२४१/०६)/मशि—६ दि. १०.०९.२००७ रोजीचे शासन पत्र.

ड) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम.१२०४/१६७/८५/मा.शि. दि. १३.०६.१९८५ रोजीचे शासनपत्र.

इ) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम. १९८४/१८५/८४३/मा. शि—४ दि. २८.०६.१९८४ रोजीचे पत्र.

फ) महाराष्ट्र राज्य, सैनिक कल्याण विभागाचे क्र. १८१६४/शै.स/सैकवि—१७ दि. २८.०२.२०१७ रोजीचे पत्र.

वरील सर्व शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, इत्यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) उपलब्ध आहेत.

Rajmata Bhagwantrao Mahavidyalaya Office 02161/262324 Aundh, Tal. Khatav (Satara)

**प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील इतर सर्वसाधारण सूचना :**

१ संलग्नित महाविद्यालये/संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांनी गुणवत्ता यादी (Merit list) तयार करून खुल्या किंवा अराखीव संवर्गातील पर्याप्त जागांवर प्रथमत: विद्यार्थी/विद्यार्थीनींना त्यांच्या मागास प्रवर्गांचा विचार न करता गुणानुक्रमे खुल्या प्रवर्गातून प्रवेश द्यावा. (सोबत पृष्ठ क्र. १९)

२ वरीलबाबत मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना खुल्या प्रवर्गातील जागांवर त्यांच्या गुणानुक्रमे प्रवेश दिला जात असल्याने आरक्षणाची विहित मर्यादा अथवा टक्केवारी त्यामुळे ओलांडली असे होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

३ सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी (अनु. जाती/अनु.जमाती व्यतिरिक्त) विहित मुदतीतील शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नॉन–क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या १० टक्के आरक्षणांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनीही त्याबाबतचे शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. (सोबत पृष्ठ क्र.२० ते २२)

४ विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची पदे ज्या मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत त्याच मागास प्रवर्गातून सर्व नियमांचे काटेकोर पालन करुन भरणे आवश्यक आहे. संबंधित मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या उपलब्धते अभावी प्रवेश रिक्त रहात असतील तर अन्य मागास प्रवर्गातून रिक्त प्रवेश पूर्ण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी. (सोबत पृष्ठ क्र.२३ ते २४)

५ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयात विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्याबाबत करावयाची कार्यवाही, शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ व क्र. ४ येथे नमूद केली आहे. ती खालीलप्रमाणे :

मुद्दा क्र. (३). : गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

मुद्दा क्र. (४). : रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी संबंधितांनी दि.११.७.१९९७ रोजीचा मूळ शासन निर्णयही कृपया सविस्तर अवलोकनी घ्यावा. आणखी असे की, सदर शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

६ विद्यापीठातील पीजीबीयुटीआर विभागाद्वारे नियंत्रित होणाऱ्या एम.फिल/पी.एचडी प्रवेशासंदर्भात युजीसी वा अन्य शिखर संस्थानी विद्यार्थी प्रवेशाबाबत सूचना जारी केल्या असतील तर सदर प्रवेशासाठी त्या विचारात घेणेत याव्यात. संबंधितांनी यासंदर्भात पीजीबीयुटीआर विभागाच्या प्रवेश माहितीपुस्तिकेचे (Prospects) सुक्ष्म अवलोकन करावे. सदर एम.फिल/पी.एचडी अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या जागा विद्यार्थ्यांच्या उपलब्धतेऐवजी रिक्त राहिल्या तर त्या त्याच मागास प्रवर्गांतर्गत भरण्यासाठी पुनःश्च विशेष प्रवेश मोहिमेचे (Special drive) आयोजन संबंधित विभागाद्वारे करण्यात येईल. तसेच विशेष मोहिमेचे आयोजन करुनही मागास प्रवर्गातील प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्या वर क्र. ५ येथे नमूद केलेल्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तदतूदीनुसार भरण्यात याव्यात.

एम.फिल/पी.एचडी विद्यार्थी प्रवेशातील रिक्त राहिलेल्या मागासवर्गीय जागांबाबत विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने केलेल्या शिफारसी, त्यांस मा. कुलगुरु व स्थायी समितीने दिलेली मान्यता यांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

आणखी असे की, सदर शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

७ दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी सदर आरक्षणाबाबत शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८ विद्यापीठातील विविध अधिविभागांनी विद्यार्थी प्रवेशातील दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेश देत असताना, विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीतील मुद्दा क्र.२ बाबत नमूद केलेल्या अ,ब आणि क या टप्प्यानुसार कार्यवाही करावी. दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत देण्यात येत आहे. (सोबत पृष्ठ क्र.२५ ते २६)

९ शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या एसईबीसी (मराठा) आरक्षण आणि अर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या आरक्षणाची कार्यवाही, यासंदर्भातील शासनाचे अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके इ. द्वारे शासनाने निर्गमित केलेल्या सूचनांच्या काटेकोर अंमलबजावणीद्वारे करावी. (सोबत पृष्ठ क्र.२७ ते २९)

१० महाविद्यालय/संस्था यांच्या स्तरावर विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या संबंधाने काही विशेष बाब निर्माण झाल्यास अथवा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचे निराकरण संबंधित महाविद्यालयातील/संस्थेतील प्रवेश समितीने, दंडक १५८ नुसार संबंधित महाविद्यालयात/संस्थेत गठित केलेल्या स्थायी समितीच्या माध्यमातून करावयाचे आहे. विद्यापीठ स्तरावरील यासंदर्भातील कार्यवाही संबंधित अधिविभागातील प्रवेश समिती आणि विशेष कक्ष स्थायी समिती (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) अथवा स्थायी समिती गठित उपसमिती यांचेद्वारे करण्यात येईल.

Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya Office 02161/262324 Aundh, Tal. Khatav (Satara)



११ स्कॉलरशीप अथवा फ्रिशीपसाठी अर्ज करणाऱ्या पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून, शासनाच्या सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य, क्रीडा व विशेष सहाय विभागाच्या क्र. इबीसी. २००३/प्र.क्र./३०१/मावक—२ दि. १.११.२००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणतेही शैक्षणिक शुल्क घेता येणार नाही.

१२ शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या सामाजिक आरक्षणापैकी ज्या मागास प्रवर्गांच्या आरक्षणासंदर्भातील बाबी न्यायप्रविष्ठ आहेत त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, व सदरबाबत शासनाकडून ज्या त्या वेळी प्राप्त होणारे शासन निर्णय/परिपत्रके इ. नुसार करणे बंधनकारक आहे.

१३ विद्यार्थी प्रवेशामध्ये सामाजिक अथवा समांतर आरक्षण लागू करण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय/परिपत्रके/शासन पत्रे इ. द्वारे विहित केलेल्या सर्व शर्ती आणि अटी या आरक्षणांतर्गत प्रवेश घेण्यासाठी लागू आहेत.

१४ महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाबाबत उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण सूचना करण्यात येत आहेत. तथापि, त्यामध्ये मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणारे नियम, अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके, विद्यापीठ नियम इ. द्वारे बदल करण्यात आल्यास त्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करुन सन २०१९—२० मधील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया विहित पध्दतीचा अवलंब करुन नियमानुसार करण्यात यावी.

महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये सन २०१९—२० करिता देण्यात येणाऱ्या विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची माहिती विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागाद्वारे स्वतंत्र परिपत्रकान्वये मागविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विभागाकडे विहित प्रपत्रातील माहिती महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागानी तात्काळ देणे अत्यावश्यक आहे याची नोंद घेण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत : माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१. पदव्युत्तर प्रवेश विभाग
२. पीजी बीयुटीआर विभाग
३. सांख्यिकी विभाग

I/C PRINCIPAL
Raja Shripatrao Bhagwantrao
Mahavidyalaya, Aundh (Satara)

शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता विद्यार्थी प्रवेशातील आरक्षण निश्चित करण्यासाठीची नियमावली :

अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी प्रवेशासाठी राज्य शासनाने एसईबीसी (मराठा) आरक्षण १६ टक्के, अर्थिक दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण १० टक्के लागू केले आहे. सदरचे आरक्षण व तत्पूर्वीचे ५० टक्के आरक्षण यामुळे विद्यार्थी प्रवेशातील एकूण आरक्षण ७६ टक्के झाले आहे. त्यानुसार विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी सर्व मागास प्रवर्गांना आरक्षण मिळू शकेल इतकी विद्यार्थी प्रवेश संख्या उपलब्ध आहे, त्या ठिकाणी आरक्षणाची अंमलबजावणी करता येते. तथापि, ज्या ठिकाणी प्रवेश क्षमता कमी आहे व सर्व मागास प्रवर्गांना टक्केवारीनुसार आरक्षण प्रदान करता येणार नाही त्याठिकाणी आरक्षणाचा प्राधान्यक्रम निर्धारित करणे आवश्यक आहे. तसेच विहित आरक्षण निर्धारणासाठी आवश्यक ते गणन करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाकडेही मार्गदर्शन मागविले आहे, परंतु विद्यापीठातील व महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया तात्काळ आरंभ होत असल्याने शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता विद्यार्थी प्रवेशातील आरक्षण निश्चित करण्यासाठीची नियमावली बनविण्याची बाब विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीची उपसमिती व महाविद्यालयांच्यासाठीच्या विशेष कक्ष (विद्यापीठ स्तर) स्थायी समितीच्या उपसमिती यांच्या संयुक्त बैठकीत विचारार्थ सादर.

१. विद्यार्थी प्रवेशातील एसईबीसी (मराठा) आरक्षण, अर्थिक दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण निर्धारित करण्यासाठी, या आरक्षणांच्या सरळसेवा भरतीसाठी राज्य शासनाने निर्गमित केलेले शासन आदेश, शासन परिपत्रके इ. मधील तरतूदी विचारात घेणेत याव्यात.

२. ज्या विषयांसाठी/अभ्यासक्रमांसाठी उपलब्ध प्रवेश क्षमता अल्प आहे (उदा.२, ३, ४, ६ इत्यादि) त्यामधील आरक्षणाचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी दि. ७.१.२०१९, दि. २९.५.२०१७ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रकातील सरळसेवा भरतीसंदर्भातील तदतूदीनुसार कार्यवाही करावी.

३. विजाभज (VJNT) प्रवर्गासाठीच्या एकत्रित ११ टक्के आरक्षणानुसार ज्या ठिकाणी १ पद उपलब्ध होते, त्या ठिकाणी उपरोल्लिखीत दि. ७.१.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार विजाअ प्रवर्गास (VJA) प्राधान्याने आरक्षण देण्यात यावे.

४. विद्यार्थी प्रवेशातील आरक्षण निश्चित करत असताना, ०.५ अथवा त्यापुढील अपूर्णांकाचे गणन '१' अशा पूर्णसंख्येत करावे. तसेच एखाद्या विषयाचे टक्केवारीनुसार आरक्षण निश्चित करताना ज्या मागास प्रवर्गासाठीचा अपूर्णांक मोठा असेल त्यास प्राधान्य देण्यात यावे. (उदा. ०.५४ आणि ०.५६ असेल तर ०.५६ ला प्राधान्य द्यावे.)

५. विद्यार्थी प्रवेशातील एसईबीसी (मराठा) आरक्षण, अर्थिक दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण याबाबतची कार्यवाही संबंधित अधिविभाग आणि पदव्युत्तर प्रवेश विभाग यांचेद्वारे ज्या त्या वेळचे मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, राज्य शासनाचे आदेश इत्यादि अनुलक्षून करणे बंधनकारक आहे.

ENGLISH TRANSLATED VERSION

**Brief Translated Version of Affiliation Letter of Shivaji University, Kolhapur**

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004 MAHARASHTRA**

PHONE: EPBX-2609000 Special Cell-2609148

Website: www.unishivaji.ac.in

**Shivaji University, Kolhapur – 416004 Maharashtra**

Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya Office 02161/262324 Aundh, Tal. Khatav (Satara)

---

Ref No./Special Cell/325 Date 13 JUN 2019

To,

1. The Principal,
   All Affiliated Colleges,
   Shivaji University, Kolhapur.
2. The Secretary,
   All Affiliated Educational Institutes,
   Shivaji University, Kolhapur.
3. The Head of the Department,
   All PG Departments,
   Shivaji University, Kolhapur.

Sub: 1. Reservation regarding students admissions in affiliated colleges/ educational institutions and various PG departments during academic year 2019-20.

2. Regarding Hostel Admissions of students during academic year 2019-20

Respected Sir,

As per the subject mentioned above percentage of social reservation regarding the admissions of the students in a universities and affiliated colleges/ institutions is informed as mentioned below for further necessary action.

| Sr. No. | Reservation Category | Percentage of prescribed reservation |
|---|---|---|
| 1 | Scheduled Caste | 13% |
| 2 | Scheduled Tribe | 7% |
| 3 | Vimukt Jati (VJA) | 3% |
| 4 | Nomadic Tribe (B) | 2.5% |
| 5 | Nomadic Tribe (C) | 3.5% |
| 6 | Nomadic tribe (D) | 2% |
| 7 | Other Backward Class | 19% |
| 8 | Socially and Educationally Backward Class | 16% |
| 9 | Economically Weaker Section | 10% |
| 10 | Open | 24% |
| | Total: | 100% |

Note: Responsible officer of Institutions/Colleges implement Government prescribed reservation policy while admitting the students till the last date of admission.

I/C PRINCIPAL
Raja Shripatrao Bhagwantrao
Mahavidyalaya, Aundh (Satara)

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX –2609000 Special Cell – 2609148
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD – NIRF- 28th Rank

Ref.No. SU/Special Cell Section/ 24

Date : 2 JUN 2017

To,

1. The Principals,
   All Affiliated Colleges,
   Shivaji University, Kolhapur.

2. The Director,
   All Recognized Institutions,
   Shivaji University, Kolhapur.

3. The Head
   All Post Graduate Department
   Department of Technology
   Shivaji University, Kolhapur.

**Sub:** I) About reservations in admission for Backward Class Students in all Courses and Faculties in the academic year 2017-2018.

II) About admissions in Hostels in the academic year 2017-2018.

Sir/Madam,

The Government of Maharashtra has been prescribed the percentages of reservation for students admission in Educational Institutions for the various courses as mentioned below :

| Sr. No. | Category | | Percentage of Reservation |
|---|---|---|---|
| 1 | Scheduled Caste | (SC) | 13 % |
| 2 | Scheduled Tribe | (ST) | 7 % |
| 3 | Vimukta Jati "A" | (VJA) | 3 % |
| 4 | Nomadic Tribe "B" | (NTB) | 2.5 % |
| 5 | Nomadic Tribe "C" | (NTC) | 3.5 % |
| 6 | Nomadic Tribe "D" | (NTD) | 2 % |
| 7 | Other Backward Classes | (OBC) | 19 % |
| 8 | Open | Open | 50 % |
| | | **Total** | **100 %** |

❖ The College/Institution admission authority has to reserve the seats for admission for Backward class candidates as per rules of the Govt. of Maharashtra up to the last date of admission.

**Parallel Reservation**

1 For Female candidates 30% seats are reserved at graduate level as per G.R.No.GEC-2000 (123/2007)/T.E. I dated 17/4/2000.

2 For disabilities candidate 3% seats are reserved as per Govt. letter No.Misc.1003/(510/2003) Est. dated 27/10/2003.

3 For Ex-servicemen and their children 10 % seats are reserved as per circulars as under-

a) महाराष्ट्र राज्य सामान्य प्रशासन विभागाचे क्र. एसआरव्हीर०१२/प्र.क्र.१६/१२/१६–अ, दि. १३ ऑगस्ट २०१४ रोजीचे शासन परिपत्रक.

b) महाराष्ट्र शासनाचे क्र.औचिमु२०१२/प्रक्र.१८७/विशि–३ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि–१६/०८/२०१२ रोजीचे शासन पत्र.

c) महाराष्ट्र शासन, मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट राज्य यांचे क्र. युएनआय/२०१२/मा. सैनिक/अवि/विशि–८ १८७११ दि–०६/१२/२०१२ रोजीचे शासन पत्र

d) महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. माजीसै–२००६/(२४१/०६)/मशि–६ दि–१०/०९/२००७ रोजीचे शासन पत्र

e) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र.टी.सी.एम.१२०४/१६७/८५/मा.शि दि–१३/०६/१९८५ रोजीचे शासन पत्र

f) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र.टी.सी.एम.१९८४/१८५/८४३/मा.शि–४ दि–२८/०६/१९८४ रोजीचे पत्र

g) महाराष्ट्र राज्य, सैनिक कल्याण विभागाचे क्र.१८१६४/शै.स/सैकवि–१७ दि–८३/०२/२०१७ रोजीचे पत्र

The above all documents are available on university website- www.unishivaji.ac.in.

**General instructions for admission Process -**

i) A consolidated list arranging all the applications irrespective of caste of categories in the order of merit is to be prepared.

ii) Initially 50% open seats as per merit list are to be filled in.

iii) There after 50% reserved seats are to be filled in from reserved category students as per prescribed percentage.

iv) The students from reserved categories, who are selected on merit, have to be treated as open category students. As such there will not be any objection, if the percentages of reserved category students exceeds 50% (Govt. No.UGC-1493/(2428)WS-4 dated 7/2/1996)

v) (Note ; As per G.R. No.TEM/3397/12926/(9086)/TE-1 dated 11/7/1997 the constitutional reservation should not exceed 50% and hence the necessary adjustment is to be made for giving reservation to S.B.C.as per G.R.)

If students belonging to particular B.C. category are not available for admission as per quota of that particular category, other students belonging to B.C category should be considered for admission. If the seats are still vacant due to non-availability of students belonging to B.C category then students from open category should be admitted with prior approval from the College sanstha Special Cell Standing Committee.

vi) Students belonging to creamy layer amongst the categories (except SC/ST) are not entitled to take reservation facilities as per Government Order No.CBC/2006/VK/15/Mavak 5 dated 30 June, 2006.

The guidelines issued by the University Grants Commission vide its letter No. D.O.F.1-6/99/SCT dated 11/5/2000 circulated vide outward No. SU/Special Cell/F.20/305 dated 4/7/2000 should also be taken into consideration for admission process.

Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya, Aundh Tal. Khatav (Satara) Office 02161/262324

As per the directions of the University Grants Commission, the implementation reports of admissions given to reserved students, in the enclosed prescribed proforma are collected from this office, every academic year. While filling the information, in the given proforma, the following instructions be taken in to account :

*vii)* No fees should be charged to the eligible and applied reserved category candidates for Scholorship/Freeship as per the Govt Resolution (महराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाम्य विभाग,) No इबीसी.२००३/प्र.क्र/३०१/मावक–२ दि–०१/११/२००३

***General Instructions for filling the proforma of the statistical information of admission:***

1) The information regarding admission to various courses and the information regarding hostel admission is to be furnished **in one hard copy and in soft copy also. Soft copy should be sent on mail : statcell@unishivaji.ac.in**
2) Every particular of the proforma be considered while filling the information.
3) In case, if there is no hostel, the NIL report should be sent.
4) In case there is central admission process (like Engineering, B.Ed., B.A. B.Ed,. M.B.A.M.C.A etc.) the information about admitted students only, should be furnished after completion of admission process.
5) The information related to Minority Students & Physically Handicapped Students should be provided as per proforma.

I am directed to request you to go through the details of the proforma carefully and submit implementation report in the enclosed proforma only on or before 31st August, 2017 while filling, proforma, if there is any doubt, please contact Special Cell, Shivaji University, Kolhapur.

(Note : For University teaching department, please submit general merit list along / with proforma)

Thanking you,

Yours faithfully,

( Dr.V.D. Nandavadekar )
Registrar

Encl : As above.

Copy to: 1. P.G Admission Section
2 P.G(BUTR) Section
3 Statistical Information Unit
For information & necessary action.

Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya Office 02161/262324 Aundh, Tal.Khatav(Satara)

I/C PRINCIPAL
Raja Shripatrao Bhagwantrao
Mahavidyalaya, Aundh (Satara

Admission GR



४/प्र. क्र. २३६/मावक-५,
'विशेष मागास प्रवर्ग" अंतर्गत

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमधून मागास प्रवर्गांकरिता राखीव जागा ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन शुद्धिपत्र क्रमांक : युएसजी- १४९३/(२४२८)/विशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ फेब्रुवारी, १९९६.

) गढेवाल कोष्टी, ७) देशकर,
·) सतसाले, १४) साडे, १५)
शी कोळी, ५) पानकोळी, ६)
ांगेला कोळी, ११) सोनकोळी,
े कोळी.
, ६) मुन्नरकापू, ७) कापेवार,

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी-१४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक -१२ जुलै, १९९४.

२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी-१४९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धीपत्रक दिनांक १५ जून, १९९५.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.

४) शासन निर्णय, क्रमांक - युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४ दिनांक २२ जून, १९९५.

**शासन शुद्धिपत्र :-** शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत -

२. **परिच्छेद - ४** : सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय असेल आणि ते मुक्त आणि मुल्याधारित जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

तंत्रशिक्षण विभाग वगळता इतर शैक्षणिक विभागांतर्गत येणाऱ्या बिगर राखीव जागा या प्रथमत: भरण्यात याव्यात. यामध्ये गुणवत्तेनुसार असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा देखील समावेश अराखीव उमेदवार म्हणून असेल. या विद्यार्थ्यांचा समावेश आरक्षणामध्ये करण्यात येऊ नये. यासाठी विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अराखीव म्हणून समजण्यासाठी पसंती कळविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात असे करताना शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण ५२ टक्केपेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत नाही.

परिच्छेद-५ मधील "मात्र बदलाबदलीने इतर प्रवर्गातून/पासून ५२% पेक्षा अधिक असणार नाही" हे शेवटचे वाक्य पूर्णत: वगळण्यात यावे.

४. हे शुद्धीपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

अ. ना. भट्टलवार
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरू
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव.

Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya * Aundh, Tal.Khatav(Satara) * 02161262324 Office

Bhaudau
I/C PRINCIPAL
Raja Shripatrao Bhagwantrao
Mahavidyalaya, Aundh (Satara)

संवेधानिक आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त होऊ न देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, १९९७.

संदर्भ :
1) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. जुलै, १९९४.
2) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रं. सीबीसी/१४९४/प्र.क्र. २३६/मावक-१ दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. १५ जून, १९९५.
3) शासन निर्णय, क्र. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीबीसी १०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दि. १५ जून, १९९५ व शुद्धिपत्रक दि. २१ मार्च, १९९६.
4) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि. २२ जून १९९५.
5) अतिरिक्त सरकारी वकील, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. एडीडीएल/डब्ल्युपी/एसएसजी दि. १०-७-१९९७.

**प्रस्तावना :**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९३/१६७/सीआर-१४१/४१/९३/१६-ब, दि. २३ मार्च, १९९४ अन्वये विविध मागास प्रवर्गासाठी एकूण ५० टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. नंतर सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या काही जातींच्या विकासासाठी काही सवलती व उपाययोजना करणे आवश्यक असल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी/१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दि. ८ डिसेंबर, १९९४ चे परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या जातीसाठी एक स्वतंत्र विशेष मागास प्रवर्ग असे संबोधण्यात येऊन त्यांच्यासाठी २ (दोन) टक्केआरक्षण ठेवण्यात आले होते. तसेच या प्रवर्गासाठी क्रिमिलीयरचे तत्व लागू नाही हेही स्पष्ट करण्यात आले होते.

दि. ८ डिसेंबर, १९९४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन आदेशास अनुसरून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विशेष मागास प्रवर्गासाठी २टक्के आरक्षण ठेवून शासन निर्णय क्र. युएसजी १४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ अन्वये विविध आरक्षणाबाबत आदेश निर्गमित केले आहेत. सदर निर्णयाद्वारे विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षणाची तृरतूद करण्यात आली असून एकूण आरक्षण ५२ टक्के विहित केले आहे. भारतीय संविधान अनुच्छेद १४ तसेच १६ अन्वये सर्व प्रवर्गातील घटकाना समानता व समान संधी मिळावी म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त असू नये असा निवाडा दिला आहे.

रिट याचिका क्र. २४९/१९९७, श्री. पांडुरंग एस. पखाले विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर, या प्रकरणी सुनावणी सुरू असताना मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश नियमावलीत संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतुद मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सॉहनी विरुद्ध केंद्र या प्रकरणी १९९३ साली दिलेल्या निवाड्यानुसार नसल्यामुळे कायदेशीर नसल्याचे शासनाचे निदर्शनास आणून दिले आहे. (संदर्भ १९९३ मा. सर्वोच्च नाय्यालय ए. आर. पू. क्र. ४७७, शीर्ष टिप्पणी (डब्ल्यू) प्रवेश नियमावलीतील



राज्य शासनाने संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद ही मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरू शकते असेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यावर संवैधानिक आरक्षणांचे प्रमाण ५२ टक्क्यावरून ५० टक्के करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील असे शासनातर्फे प्रतिपादन केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले असून उपरोक्त संदर्भात शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :**

शासन आता या शासन निर्णयाद्वारे असे आदेश देत आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थातील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. युएसजी १४९३/(२४२८)/विशि-४, दि. २२ जून, १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या २ टक्के जागांचे आरक्षणाबाबत पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. हे आदेश १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत असून तात्काळ अंमलात येतील व उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थातील सर्व विद्या शाखांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

1. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती. त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.
2. भारतीय संविधानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. टीईएम १०२४/(६३०३) तांशि-१, दि. ३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहित केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील. मुक्त (मेरीट सीटस्) तसेच मूल्यभारित (पेमेंट सीटस्) जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असावे.
3. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.
4. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवाराना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरामसळ करून भरण्यात याव्यात.

३. शासन यापुढे असेही आदेश देत आहे की, १९९७-९८ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असेल व दि. ९-७-१९९७ रोजी किंवा तत्पूर्वी या विभागाच्या दि. २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवेश देण्यात आले असतील तर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

1. विशेष मागासवर्ग प्रवर्गातर्गत करण्यात आलेल्या प्रवेशास बाधा न आणता पुढील प्रवेश प्रक्रियेत काही कारणास्तव होणाऱ्या रिक्त जागांवर ५० टक्के आरक्षित जागा जुळवून घ्याव्यात.
2. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यापेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

औ. शि. विहाडे
शासनाचे सहसचिव

प्रति –
कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya * Office 02161/262324 * Aundh, Tal. Khatav (Satara) *

I/C PRINCIPAL
Raja Shripatrao Bhagwantrao
Mahavidyalaya, Aundh (Satara)

200408111303040009-2402

**महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन निर्णय क्र. जीईसी-१०००/(१२३/२०००)/तांशि-१**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १७ एप्रिल, २०००

**प्रस्तावना:-**

भारताच्या संविधानात, स्त्री-पुरूष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरीकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरूषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमाकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने खरा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करून सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दि.२२.६.१९९४ अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३०टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरिता ३०टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

**शासन निर्णय:-**

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा १०० असतील तर त्यापैकी ३० जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) राहील. उदाहरणार्थ जसे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता १३ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३०टक्के आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरूष संवर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी १०९ जागा असतील तर त्यापैकी १३ जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेऊन त्यापैकी ३०टक्के म्हणजेच ४ जागा ह्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.



Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya Office 02161262324 Aundh, Tal.Khatav(Satara)

(कृ.मा.प.

I/C PRINCIPAL
Raja Shripatrao Bhagwantrao
Mahavidyalaya, Aundh (Satara)

वर उल्लेखिलेल्या पध्दतीनेच इतर सर्व प्रवर्गांकरिताही सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत म ३०टक्के समांतरपणे आरक्षण ठेवण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता मूल्यभारीत व मु जागांवर देण्यात येतात हया प्रवेशा अंतर्गत देखील ३०टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

सध्या सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र.डब्ल्युबीपी-१०९५/(२७१९)/व्यशि-५, दि.१७.१.१९९६ अन्वये ठेवलेल्या २५ टक्के आरक्षणात वाढ करून आता ते ३०टक्के इतके करण्यात येत आहे..

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरूष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पदुम विभागांतर्गत येणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागांकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन २०००-२००१ पासून अंमलात येतील.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, उद्योगधंदे-संस्था-समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व कुलसचिव
सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने व संस्था (तंत्र शिक्षण संचालकांमार्फत)
प्राचार्य, सर्व वरिष्ठ महाविद्यालये (उच्च शिक्षण संचालकांमार्फत)
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, कृषि यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,
मा. प्रधान सचिव, वित्त यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव (सर्वसाधारण उपविभाग), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखाली येणारी सर्व विभागीय कार्यालये (संबंधित विभागांमार्फत)
सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, तांशि-१.

Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya, Aundh Tal.Khatav (Satara) Office 02161/262324

I/c PRINCIPAL
Raja Shripatrao Bhagwantrao Mahavidyalaya, Aundh (Satara)